महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग

कार्यकारी अभियंता,

छत्रपती शिवाजी महाराज स्मारक प्रकल्प विभाग,

बी.बी.आर.एस.क्र.५, भूखंड क्र.१२०,

झुलेलाल मंदिराच्या शेजारी,

कुलाबा, कफ परेड,

मुंबई-४०० ००५.

# नागरिकांची सनद

# २०१८

## सूची


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | प्रस्तावना | १ |
| २ | विभागाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी | २ |
| ३ | विभागाची रचना | ३ |
| ४ | विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र | ४ |
| ५ | गाऱ्हाणी/तक्रारी यांचे निराकरण | ५ |
| ६ | सनदेची अंमलबजावणी | ६ |
| ७ | परिशिष्टे - अ | ७ |
|  | परिशिष्टे - ब | ८ |

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत मुख्य अभियंता , (वि.प्र) सा.बां. विभाग, मुंबई हा प्रादेशिक विभाग येत असून त्या विभागातंर्गत अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर, मुंबई हे मंडळ कार्यालय कार्यरत आहे, सदर मंडळ कार्यालयातंर्गत ७ विभाग, कार्यरत असून, त्यापैकी मुंबई शहर जिल्हयासाठी विशेषतः अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाच्या प्रकल्पासाठी हा विभाग कार्यान्वित झालेला असून, या विभागाचे नाव छत्रपती शिवाज महाराज स्मारक प्रकल्प विभाग, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५. हे कार्यालय शासन निर्णय क्रमांक इएसटी/२०१६/प्रक्र/३४/प्रशासन-१ मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. या परिपत्रका नुसार दिनांक ३/६/२०१६ पासून कार्यरत आहे. हा विभाग नागरिकांना खालील सुविधा पूरविण्यास बांधिल आहे.

सार्वजनिक सेवा तत्परतेने, सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक वागणूक मिळून उपलब्ध व्हाव्यात, व नागरिकांचे सामाजिक प्रश्न सहानुभूतीपूर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन विचारात घेऊन तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी ही **“नागरिकांची सनद”** तयार करण्यात आली आहे.

**२. (१) बांधिलकी :-**

वरील सर्व कर्तव्ये पार पाडताना सार्वजनिक बांधकाम छत्रपती शिवाजी महाराज स्मारक प्रकल्प विभाग.

**अ)** पारदर्शकता व निष्ठा ठेवील.
**ब)** सोजन्यपूर्ण व मदतीची वृत्ती ठेऊन कामाच्या वेळेत निपटारा करेल.
**क)** सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

**(२) नागरिकांची जबाबदारी :-**

* नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.
* शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.
* नागरिकांनी सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्य करावे.
* नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.
* विहित केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.
* सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.
* नागरिकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करु नयेत.
* रस्ते बांधणे, इमारतीचे बांधकाम करणे व केलेली देखभाल व दुरूस्तीच्या कामांचे जतन ही नागरिकांची जबाबदारी राहिल.
* नागरिकांनी कायदेशीर तरतुदी, नियम, अलिखित संकेत यांचे पालन करावे.

**(३) सार्वजनिक बांधकाम विभागाची रचना :-**

शासन स्तरावर मा. मंत्री (सार्वजनिक बांधकाम) तसेच मा. राज्यमंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांचे अधिपत्याखाली विभागाचे एक अतिरिक्त मुख्य सचिव व त्यांच्या अधिपत्याखाली दोन सचिव/ (सचिव(रस्ते) व सचिव (बांधकामे)) हे सर्वोच्च प्रशासनिक अधिकारी आहेत.

शासन स्तरावर विविध धोरणात्मक, निर्णय, विभागांचा अर्थसंकल्प, सर्व राज्य शासकीय विभागांच्या स्थापत्य कामे व देखभाल/दुरुस्ती इत्यादी बाबी हाताळल्या जातात.

प्रादेशिक स्तरावर मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प) सा. बां. विभाग, मुंबई हे सर्वोच्च तांत्रिक अधिकारी आहेत. त्यांचे मुख्यालय मुंबई या ठिकाणी कार्यरत आहे. प्रादेशिक विभागांतर्गत कामांची अंमलबजावणी मुख्य अभियंता स्तरावर केली जाते.

प्रादेशिक स्तरावर मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प) सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांच्या अखत्यारीतील अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर, मुंबई हे मंडळ कार्यालय कार्यरत आहे.

मुंबई बांधकाम मंडळ, चेंबुर, मुंबई या मंडळाअंतर्गत एकूण 7 विभागीय कार्यालये कार्यरत असून, कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक प्रकल्प विभाग हे विभाग कफ परेड, कुलाबा, मुंबई-400 005 या विभागाची कार्यरत असून या विभागांतर्गत खालील ४ उपविभाग कार्यरत आहेत.

१) उपअभियंता छत्रपती शिवाजी महाराज स्मारक प्रकल्प उपविभाग क्र.१, कफ परेड, मुंबई-४०० ००५.

२) उपअभियंता छत्रपती शिवाजी महाराज स्मारक प्रकल्प उपविभाग क्र.२, कफ परेड, मुंबई-४०० ००५.

३) उपअभियंता छत्रपती शिवाजी महाराज स्मारक प्रकल्प उपविभाग क्र.३, कफ परेड, मुंबई-४०० ००५.

४) उपअभियंता छत्रपती शिवाजी महाराज स्मारक प्रकल्प उपविभाग क्र.४, कफ परेड, मुंबई-४०० ००५.

**४. विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र व माहितीची सुलभता :-**

**अ) कार्यालयाचे कार्यक्षेत्र :-** या कार्यालयाचे कार्यक्षेत्र मुंबई शहर जिल्हयासाठी मर्यादित आहे. या विभागांतर्गत अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाचे प्रकल्प करणे. हा भव्य व महत्वाकांक्षी प्रकल्प कार्यान्वित आहे.

प्रस्तावनेत नमुद केलेल्या सार्वजनिक सेवा सार्वजनिक बांधकाम विभाग पुरवित असतो. कामांच्या अमंलबजावणीसाठी सार्वजनिक बांधकाम नियमावली, लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादीं चे काटेकोरपणे पालन क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून केले लाते.

**ब) माहितीची सुलभता :-** विभागाचे बेसाईटवरुन (संकेत स्थळावरुन) तसेच वेळोवेळी प्रसिध्द केल्या जाणाऱ्या पत्रकाद्वारे जनतेला आकडेवारीचा तपशील सुलभतेने उपलब्ध होईल.

**५. गाऱ्हाण्यांचे निराकरण सनदेचा आढावा व जनसामान्यंची छाननी**

**अ) गाऱ्हाणी / तक्रारी यांचे निराकरण :**

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गाऱ्हाणी विभागाबाबत अथवा काही कामाबाबत तक्रारी असतील तर, ते गाऱ्हाणी / तक्रारी त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालयाकडे मांडावे उदा. नागरिकांना उपविभागीय कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे / तक्रार असल्यास विभागीय कार्यालयप्रमुखाकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गाऱ्हाणे मांडावे व विभाग कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे / तक्रार असल्यास मंडळ कार्यालयाच्या अधीक्षक अभिंयत्याकडे गाऱ्हाणे मांडावे. अशा गाऱ्हाणी / तक्रारीचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडून शासन नियमाप्रमाणे विहित वेळेत करण्यात येईल.

नागरिक गाऱ्हाणी समक्ष भेटीत अथवा पत्राने मांडू शकतात.

**ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन :**

या विभागाच्या नागरिकांचा सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा व विभागाकडून घेण्यात येईल.

**क) जनसामान्यांकडून सूचना :-**

या विभागाची सन सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सूचनांचा गांभिर्यपूर्वक विचार करुन, त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वतःहून काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करित नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणाऱ्यांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

**६. नागरिकांच्या सनदेची अमंलबजावणी :-**

सार्वजपिक बांधकाम विभागाच्या या नागरिकांच्या सनदेची अमंलबजावणी दिनांक १ जून २००७ पासून करण्यास विभाग कटिबध्द आहे. सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया/अभिप्राय मागविण्यात येतात व त्यांच्या सूचनांचा यथोचीत आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतात.

हा विभाग खात्रीपूर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. ग्राहक सेवेची उद्दिष्टे प्राधान्याने अंगीकारुन ग्राहकांना त्वरीत प्रतिसाद दिला जाईल. विभागाच्या कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना सौजन्यपूर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरिकांच्या गाऱ्हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल.

**७. परिशिष्टे :-**

**अ)** कार्यालये दर्शविणारा वृक्ष तक्ता
(Tree-chart)

**कार्यकारी अभियंता**

| | | | |
|---|---|---|---|
| **उप अभियंता** | **उप अभियंता** | **उप अभियंता** | **उप अभियंता** |
| छत्रपती शिवाजी महाराज स्मारक प्रकल्प | छत्रपती शिवाजी महाराज स्मारक प्रकल्प | छत्रपती शिवाजी महाराज स्मारक प्रकल्प | छत्रपती शिवाजी महाराज स्मारक प्रकल्प |
| उपविभाग क्र.१, | उपविभाग क्र.२, | उपविभाग क्र.३, | उपविभाग क्र.४, |
| कफ परेड, | कफ परेड, | कफ परेड, | कफ परेड, |
| मुंबई-४०० ००५. | मुंबई-४०० ००५. | मुंबई-४०० ००५. | मुंबई-४०० ००५. |

**७. परिशिष्टे :-**

**ब)** कार्यक्षेत्राचा नकाशा

५) शासकीय नवीन बांधकामे उत्तम गुणवत्तेची, टिकाऊ, सुरक्षित अत्यावश्यक, सुविधायुक्त, सौदर्यपूर्ण व सभोवतालचा परिसर सुशोभित करणे.
६) इतर सर्व शासकीय विभागांना आवश्यक असेल तेव्हा तांत्रिक सल्ला देणे.
७) आपत्कालीन व्यवस्थेसाठी तत्परतेने स्थापत्य अभियांत्रिकीशी संबंधित आवश्यक ती कामे करणे व मदत करणे.
८) या विभागातील व विभागाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालयातील कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या समजावून सांगणे.
९) या विभागातील व विभागाच्या अखत्यारीतील प्रत्येक कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गाऱ्हाणी/तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.
१०) माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत मागितलेली माहिती संबंधितांना विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे.
११) नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.
१२) संगणकीकरणाबाबत सर्व विभागीय कार्यालये, मंडळ कार्यालये, प्रादेशिक कार्यालये तसेच मंत्रालय यांना नेटवर्कने जोडून आवश्क माहिती उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशिल राहणे.
१३) शासकीय कामकाजात सुसूतज्ञ ठेवणे.
१४) विभागाची विविध माहिती या वेबसाईट वर अद्यावत उपलब्ध करणे.